२५१५

JS(S)
PL discuss
21/07/22

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत
"हर घर तिरंगा" हा उपक्रम दिनांक १३
ऑगस्ट ते १५ ऑगस्ट, २०२२ या
कालावधीत राबविण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :२० जुलै, २०२२

वाचा :-
१) शासन परिपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग सम क्रमांक दिनांक २० जून, २०२२
२) शासन परिपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग सम क्रमांक दिनांक ३० जून, २०२२
३) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र.१६१/सां.का.४, दिनांक ३० जून, २०२२

शासन परिपत्रक :-

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनुसार "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्याबाबतच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना उपर्निर्दिष्ट क्र. १ च्या शासन परिपत्रकान्वये एकत्रितरित्या प्रसृत करण्यात आल्या आहेत. उपर्निर्दिष्ट क्र. २ च्या शासन परिपत्रकान्वये "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर झंडा" या उपक्रमास "हर घर तिरंगा" उपक्रम असे संबोधण्याबाबत कळविले आहे. उपर्निर्दिष्ट क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये विविध पातळीवर "स्वराज्य महोत्सव" यांचे आयोजन करणेबाबत कळविले आहे. केंद्रिय कॅबिनेट सचिवांच्या सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांसोबत दिनांक १५ जुलै, २०२२ च्या दूरदृष्यप्रणालीद्वारे झालेल्या बैठकीमधील सादरीकरणामध्ये "हर घर तिरंगा" हा उपक्रम आता दिनांक १३ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत राबविण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे. तसेच मा. गृह मंत्री, भारत सरकार यांनी दिनांक १७ जुलै, २०२२ रोजी दूरदृश्यप्रणालीद्वारे "हर घर तिरंगा" हा उपक्रम देशात यशस्वी करण्यासाठी सूचना दिल्या आहेत.

२. केंद्र शासनाने "हर घर तिरंगा" या उपक्रमाच्या वेळापत्रकात केलेला बदल विचारात घेता "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" हा उपक्रम राज्यात दिनांक १३ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत राबविण्यात यावा.

३. "हर घर तिरंगा" हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रसार, प्रचार व जाणीव जागृती मोहिमेसाठी सांस्कृतिक कार्य विभागाने जिंगल, गीते, ध्वनीचित्रफित, जाहिराती, लघु चित्रपट, सेलिब्रिटीच्या माध्यमातून आवाहन, पोस्टर इ. याची निर्मिती केली आहे. ती शासनाच्या https://mahaamrut.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर संकेत स्थळावर सदरची माहिती कोणत्याही विभागास / नागरिकाला उपलब्ध होऊ शकते. त्याचा अधिकाधिक उपयोग करुन घेण्यात यावा.

४. "हर घर तिरंगा" या उपक्रमाच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांना खालीलप्रमाणे सर्वसाधारण सूचना देण्यात येत आहेत.

१. सर्व शासकीय / निमशासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी समाज माध्यमांद्वारे (फेसबुकपेज, ट्विटर, इंस्ट्राग्राम, व्हॉटस्‌ॲप इ.) तिरंगा विषयक चित्र, संदेश प्रदर्शित करण्यासाठी त्यांना संबंधित विभागांमार्फत आवाहन करण्यात यावे.
२. महाराष्ट्र शासनाच्या प्रत्येक विभागाच्या वेबसाईटच्या दर्शनी भागावर "हर घर तिरंगा" ही टॅगलाईन व तिरंग्याचे चित्र प्रदर्शित करावे.
३. शालेय शिक्षण विभागाने, उच्च तंत्र शिक्षण विभागाने, आदिवासी विभागाने व सामाजिक न्याय विभागाने सर्व शालेय व महाविद्यालयीन तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून (एनएसएस, एनसीसीए द्वारे) प्रभातफेरीचे आयोजन करुन "हर घर तिरंगा" या उपक्रमाविषयी पालक व नागरिकांमध्ये प्रचार, प्रसार व जाणीव जागृती करण्यात यावी.
४. "हर घर तिरंगा" या उपक्रमांतर्गत सर्व शासकीय व निम शासकीय कार्यालये, शासकीय इमारती, शासकीय वसाहतींमध्ये राष्ट्रध्वज फडकेल, याची विशेष काळजी सार्वजनिक बांधकाम विभागाने घेणे आवश्यक आहे.
५. राज्यातील सर्व सहकारी संस्था / सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये राष्ट्रध्वज फडकविला जाईल, याची खातरजमा सहकार विभागाने करणे आवश्यक राहील.
६. "हर घर तिरंगा" या उपक्रमात जास्तीत-जास्त लोकसहभाग मिळविण्यासाठी सर्व प्रशासकीय विभाग व क्षेत्रिय कार्यालयाने कल्पक उपाययोजना कराव्यात.
७. राज्यातील नाट्यगृह व चित्रपटगृहे याठिकाणी चित्रपट किंवा नाटक सुरु होण्यापूर्वी "हर घर तिरंगा" या उपक्रमासंदर्भातील गाणी, जिंगल्स, ध्वनीचित्रफिती, ध्वनीफिते दाखविण्यात / वाजविण्यात याव्यात. यासंदर्भात चित्रपटगृहे व नाट्यगृहे व्यवस्थापकांना गृह विभाग व महसूल विभागाकडून स्थानिक पातळीवर सूचना देण्यात याव्यात.
८. राज्यातील खाजगी टि.व्ही. वाहिन्या, कम्युनिटी रेडिओ, स्थानिक केबल धारक, एफएम रेडिओ, यांनाही "हर घर तिरंगा" या उपक्रमाच्या ध्वनीफिती, ध्वनीचित्रफिती, जिंगल्स, गीते, पोस्टर्स दाखविण्याबाबत / ऐकविण्याबाबत गृह विभाग, महसूल विभाग, माहिती व जनसंपर्क विभागाकडून सर्व संबंधितांना निर्देश द्यावेत.
९. "हर घर तिरंगा" अंतर्गत राष्ट्रध्वज नागरिकांना विकत घेण्यासाठीची उपलब्धता तलाठी कार्यालय, पोस्ट ऑफिस, ग्रामपंचायत ऑफिस, रास्त भाव धान्य दुकाने व

महानगर पालिका / नगर पालिका वॉर्ड ऑफिसेस यांच्यामार्फत करण्याची विशेष काळजी ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि महसूल व वन विभाग यांनी घ्यावी.

१०. राज्यातील सर्व आदिवासी पाडयांमध्ये राष्ट्रध्वजा विषयी प्रचार, प्रसार व जाणीव जागृती तसेच राष्ट्रध्वज उपलब्धता यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत कार्यवाही करण्यात यावी.

५. भारतीय ध्वज संहितेचे पालन होणे व जाणते-अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये याची दक्षता घेण्याबाबत नागरिकांमध्ये जाणीवजागृती निर्माण करुन घेण्याची सर्व विभागांनी विशेष काळजी घ्यावी.

६. स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस यंत्रणा, महसूल यंत्रणा, शाळा व महाविद्यालये, परिवहन, आरोग्य केंद्र, रास्त भाव धान्य दुकाने, सहकारी संस्था अशा सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन बाबींशी निगडीत यंत्रणांद्वारे "हर घर तिरंगा" हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांचे मोठे योगदान असेल, याची सर्व संबंधित विभागांनी खातरजमा करावी.

७. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२२०७२१०८५८३८७८२३ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**( मनु कुमार श्रीवास्तव )**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव मंत्रालय, मुंबई
५. सर्व विभागीय आयुक्त
६. सर्व पोलीस आयुक्त
७. सर्व जिल्हाधिकारी
८. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०. सर्व आयुक्त, महानगर पालिका
११. सर्व मुख्य अधिकारी, नगर पालिका / नगर पंचायत
१२. सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी
१३. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखाली सर्व क्षेत्रिय अधिकारी
१४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१५. निवड नस्ती, सां.का.४